## -: प्रेसनोट दिनांक- ३१/०५/२०२४ :-

आरोपी लोकसेवक लोकसेवक अभिजीत नारायण.पवार, मंडल अधिकारी, कोडोली ता. पन्हाळा जि.कोल्हापूर वर्ग ३ रा.नारायण फ्लॅट नं.२, नारायण पार्क, रूक्मिणी नगर, हॉटेल व्हिक्टर पॅलेसजवळ, कोल्हापूर व खाजगी इसम रणजित उर्फ आप्पा आनंदराव पाटील वय ४८ वर्षे.रा. कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर यांचे लाच मागणीबाबत......

---

यातील मुळ तक्रारदार यांचे काका यांनी माले ता.पन्हाळा गट नं.१६९९ येथील २ गुंठे इतकी शेतजमीन दि.२४/११/२०२३ रोजी रजिस्टर खरेदी दस्ताने खरेदी केलेली आहे. यातील मुळ तक्रारदार यांचे काकांनी वरीलप्रमाणे खरेदी केलेल्या शेत जमीनीचे ७/१२ उता-यास नोंद होवून ७/१२ उतारा मिळणेकरीता त्यांनी तलाठी किशोर पाटील सज्जा माले ता.पन्हाळा जि.कोल्हापूर यांचेशी व मंडल अधिकारी अभिजीत पवार यांचेशी संपर्क केला होता.त्यावेळी त्यांनी मुळ तक्रारदार यांचे काका यांचे नांव ७/१२ उता-यास लावण्याकरीता मुळ तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रू.ची मागणी केली होती. त्यानंतर खाजगी इसम रणजित उर्फ आप्पा पाटील यांनी मुळ तक्रारदार यांचेशी संपर्क करून त्यांचे काका यांचे नांव ७/१२ उता-यास लावून देण्याकरीता मंडल अधिकारी अभिजीत पवार व तलाठी किशोर पाटील यांचेकरीता २०,०००/- रू. लाचेची मागणी करत असलेबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार केली होती.

तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे पडताळणी केली असता, तक्रारदार यांचे काकानी खरेदी केलेल्या जमीनीची सात बारा पत्रकी नोंद करून उतारा देणेकरीता खाजगी इसम रणजीत उर्फ आप्पा पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे मंडल अधिकारी अभिजीत पवार व तलाठी किशोर पाटील माले सज्जा, ता. पन्हाळा यांचेकरीता २०,०००/- रू. लाचेची मागणी करून सदरची रक्कम ते तुझ्याकडून घेणार नाहीत माझ्याकडे दे असे म्हणून तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली तसेच मंडल अधिकारी अभिजीत पवार यांनी तक्रारदार यांचे वरील कामाकरीता खाजगी इसम रणजीत पाटील यांनी मागणी केलेल्या २०,०००/- रू. लाच रक्कमेमध्ये तडजोड करून स्वत:साठी तसेच तलाठी किशोर पाटील माले, ता.पन्हाळा यांचेकरीता १५,०००/- रू.लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम खाजगी इसम रणजीत उर्फ आप्पा पाटील यांचेकडे देण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले त्यावरून **आरोपी लोकसेवक अभिजीत नारायण पवार, मंडल अधिकारी, कोडोली ता. पन्हाळा जि.कोल्हापूर वर्ग ३ रा.नारायण फ्लॅट नं.२, नारायण पार्क, रूक्मिणी नगर, हॉटेल व्हिक्टर पॅलेसजवळ, कोल्हापूर व खाजगी इसम रणजीत उर्फ आप्पा आनंदराव पाटील वय. ४८वर्षे.रा. गणपती मंदीरजवळ कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर** यांचेविरुध्द कोडोली पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, प्रकाश भंडारे, स.पो.उप निरीक्षक, अजय चव्हाण, पो.हे.कॉ., सुधीर पाटील, पो.ना. यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई **टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे **दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३**